-105

मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ मधील
कलम १४[ह]नुसार अनर्हता.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
आदेश क्रमांक ग्रापप्र १०९१/प्र.क्र.१७३६/२१ अ,
मंत्रालय, मुंबई ४०००३२ दिनांक ६ ~~मार्च~~ एप्रिल १९९१.

अपर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे क्रमांक विकास ग्रापं१/५१/९१, दि. ८ जानेवारी, १९९१ चे अ.शा.पत्र कृपया पहावे.

शासन आदेश
=========

मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, १९५८ मधील कलम १२९ अन्वये विहित केलेली कार्यपध्दती योग्य पध्दतीने न अवलंबिता ग्राम पंचायत सदस्याना उक्त अधिनियमातील कलम १४[ह] अन्वये अनर्हता ठरविण्याची कार्यवाही सुरु केली जाते. परिणामी, ब-याचशा प्रकरणी असे सदस्य थकबाकीदार असल्याचे सिध्द होत नाही असे शासनाच्या नजरेस आणून देण्यात आले आहे. ग्राम पंचायत करांची बाकी असल्याबद्दलची पुरेशी कल्पना ग्राम पंचायत सदस्यांना देण्यात आली पाहिजे. अशी कल्पना देऊनही ते थकबाकीदार राहिले तरच त्यांच्या विरुध्द उक्त अधिनियमाच्या कलम १४[ह] च्या तरतुदींनुसार योग्य ती कारवाई करणे उचित ठरेल.

२. याबाबत शासन असे आदेश देत आहे की "ग्राम पंचायत करांचा भरणा न करणा-या ग्राम पंचायत सदस्यांना माहिती देणे "असा विषय ग्राम पंचायतींच्या प्रत्येक बैठकीच्या विषय पत्रिकेवर ठेवावा व ग्राम पंचायत करांचा भरणा न केलेल्या ग्राम पंचायत सदस्यांची नावे अशा बैठकीसमोर ग्राम पंचायत सचिव यांनी सादर करावीत. सरपंच किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उप सरपंच यांनी अशी नावे ग्राम पंचायतीच्या प्रत्येक बैठकीसमोर सादर केली आहेत याची खात्री करुन घ्यावी. ग्राम पंचायत सदस्यानीही प्रत्येक बैठकीसमोर अशी नावे सादर करण्याचा आग्रह धरावा. ग्राम पंचायत सदस्यांना त्यांनी करांचा भरणा केलेला नाही. याची कल्पना यावी म्हणून अशी नावे सादर करावयाची असल्यामुळे, ग्राम पंचायत करांचा भरणा करण्याबाबतची सूचना ग्राम पंचायत सदस्यांना देण्यात आल्यापासून त्यांनी अशा करांचा प्रत्यक्ष भरणा करीपर्यंत होणा-या ग्राम पंचायतींच्या प्रत्येक बैठकीसमोर करांचा भरणा न करणा-या सदस्यांची नावे सादर करावीत. अशी नावे ग्राम पंचायतीच्या बैठकीसमोर सादर न करता कोणत्याही सदस्याविरुध्द उक्त अधिनियमाच्या कलम १४[ह] च्या तरतुदींनुसार

...२

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी.

अर्हे ठरविण्याची कार्यवाही सुरु केल्याचे लक्षात आल्यास ~~अपल्यास~~ संबंधित ग्राम पंचायत सचिव तसेच सरपंच किंवा त्यांच्या अनुपस्थितीत उप सरपंच यांच्या विरुध्द संबंधित नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ ज. स. घाणेकर ]
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त,

सर्व जिल्हाधिकारी [ जिल्हाधिकारी, मुंबई व जिल्हाधिकारी मुंबई